**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. आनंदराव बाबूराव पाटील
मु.पो. गडमुडशिंगी, (शिवाजी चौकाजवळ),
ता. करवीर, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

जनं माहिती अधिकारी तथा
उप निबंधक सहकारी संस्था,
कोल्हापूर शहर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. आनंदराव बाबूराव पाटील, मु.पो. गडमुडशिंगी, (शिवाजी चौकाजवळ), ता. करवीर, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर डॉ. अे. बी. जोगदंड

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर, जि. कोल्हापूर श्री. अरुण पां. काकडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.१०.२००५ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.१०.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.१२.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.३.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

उत्तमराव पाटील (तात्या) सहकारी पाणी पुरवठा मंडळी लि., गडमुडशिंगी या संस्थेचा सन २००४-२००५ चा अहवाल जाहीर झाला आहे. त्यामध्ये पाणीपट्टी येणे रु. ३६,१९,००१.३८ इतकी दाखविली आहे. सदर पाणीपट्टी येणे असलेल्या थकबाकीदारांची माहिती

## विवेचन

उत्तमराव पाटील (तात्या) सहकारी पाणी पुरवठा मंडळी लि., गडमुडशिंगी, ता. करवीर, जि. कोल्हापूर या संस्थेकडील पाणी पुरवठ्याच्या थकबाकीदारांची सन २००४ - २००५ मधील माहिती अपीलकर्ता श्री. आनंदराव बाबूराव पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था; कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे श्री. पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. माहिती उपलब्ध करुन देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना दिला. परंतु त्यानंतरही माहिती मिळाली नाही, म्हणून श्री. पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी व माहिती मिळावी, अशी मागणी त्यांनी अपिलात केली आहे.

श्री. पाटील यांनी मूळ अर्ज संबंधित पाणी पुरवठा संस्थेकडे केला होता. त्यांनी प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलाच्या स्वरुपात आपण जन माहिती अधिकारी व नंतर अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता, असे श्री. पाटील यांनी सांगितले. आपल्या कार्यालयाशी संबंधित असलेली अशी ही माहिती नसल्यामुळे ती आपण देऊ शकलो नाही, असे श्री. काकडे यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी श्री. अरुण पां. काकडे यांनी माहिती मिळवून देण्याबाबत कोणतीही तत्परता दाखविली नाही, असे प्रतिपादन श्री. पाटील यांनी अर्जामध्ये व आयोगापुढील सुनावणीत केले. परंतु आपण सातत्याने पाठपुरावा करुन संबंधित संस्थेला कारवाईची सूचना देण्यापर्यंत प्रयत्न केले, मात्र संस्थेने प्रतिसाद दिला नाही, असे जन माहिती अधिकारी श्री. अरुण पां. काकडे व

अपिलीय प्राधिकारी डॉ. अे.बी. जोगदंड यांनी कागदपत्रांसह स्पष्ट केले. मात्र माहिती न देणाऱ्या संस्थेबाबत अधिक कडक पावले उचलणे उचित ठरले असते.

संबंधित पाणी पुरवठा संस्थेने श्री. पाटील यांना हवी असलेली माहिती देणे आवश्यक होते, कारण या संस्थेच्या सन २००४-०५ च्या अहवालात रु. ३६,१९,००१.३८ एवढी थकबाकी दर्शविली आहे. संस्थेतील पदाधिकाऱ्यांचा थकबाकीदारांत प्रामुख्याने समावेश आहे, असा दावा श्री. पाटील यांनी आयोगापुढील सुनावणीत केला.

सार्वजनिक संस्थेच्या संदर्भातील ही माहिती प्राप्त होणे व त्याबाबतचा तपशील नागरिकांपुढे येणे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपेक्षित असलेल्या सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या दृष्टीने महत्वाचे आहे. जन माहिती अधिकारी यांनी उत्तमराव पाटील (तात्या) सहकारी पाणी पुरवठा मंडळी या संस्थेकडून याबाबत खुलासा मागवून घेणे व संपूर्ण माहिती प्राप्त करुन ती श्री. पाटील यांना देणे आवश्यक आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य.

२. उत्तमराव पाटील (तात्या) सहकारी पाणी पुरवठा मंडळी या संस्थेकडून माहिती मागविण्याच्या अर्जाची गांभीर्याने दखल न घेतल्याबाबत लेखी खुलासा मागवून माहिती त्वरित प्राप्त करुन घ्यावी. दि. १५.११.२००७ पर्यंत संस्थेने ही माहिती न दिल्यास तिच्यावर शिस्तभंगाबद्दल योग्य ती पुढील कार्यवाही करावी. जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग श्री. अरुण पां. काकडे यांनी याच्या पूर्ततेचा अहवाल आयोगाला दि. २०.११.२००७ पर्यंत सादर करावा.

३. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत, त्यामुळे शास्ती नाही.

**पुणे**
**दि. २९.१०.२००७**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट,
जिल्हा परिषदेसमोर, नागाळा पार्क,
कोल्हापूर-४१६ ००३ अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
सह दुय्यम निबंधक वर्ग-१, कोल्हापूर,
जि. कोल्हापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सह दुय्यम निबंधक वर्ग-२,
करवीर क्र. ४, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दिलीप अशोक देसाई, ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट, जिल्हा परिषदेसमोर, नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६ ००३

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-१, कोल्हापूर, जि. कोल्हापूर सौ. निलिमा धायगुडे

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, करवीर क्र. ४, जि. कोल्हापूर श्री. सुंदर मदनराव जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.३.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

ग्रामपंचायत, तासगाव हद्दीतील सिटी सर्व्हे क्र. १७२/५अ/१/२ मिळकतीमध्ये नगर विकास कोल्हापूर विभाग, मंजूर नकाशा प्रमाणे दर्शविलेल्या काही भूखंडाची विक्री व खरेदी दस्ताच्या नोंदी, कोणत्या मंजूर नकाशाप्रमाणे केल्या त्या नकाशाच्या सांक्षाकित प्रती व अन्य संबंधित माहिती

## विवेचन

ग्रामपंचायत, तासगाव हद्दीतील सिटी सर्व्हे क्र. १७२/५अ/१/२ या मिळकतीमध्ये नगर विकास कोल्हापूर विभाग मंजूर नकाशा प्रमाणे दर्शविलेल्या काही भूखंडांची विक्री व खरेदी दस्ताच्या नोंदी कोणत्या मंजूर नकाशाप्रमाणे केल्या, त्या नकाशाच्या सांक्षाकित प्रती व अन्य संबंधित माहिती अपीलकर्ता श्री. दिलीप अशोक देसाई यांनी जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, करवीर क्र.४, कसबा बावडा रोड, कोल्हापूर, जि. कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. विहित मुदतीत आपल्याला ही माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन माहितीची व जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची मागणी श्री. देसाई यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा दुय्यम निबंधक वर्ग-१, कोल्हापूर यांच्याकडे अपीलाद्वारे केली. त्यांनतरही माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. देसाई यांनी सह. दुय्यम निबंधक वर्ग-२ करवीर क्र.४, कोल्हापूर यांच्याकडे मागितलेल्या दस्ताच्या प्रती तयार असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना विहित मुदतीत कळविले होते. श्री. देसाई व्यक्तिशः माहिती घेणार असल्याचे अर्जात नमूद केले होते. तरीही शिपायामार्फत त्यांच्याकडे विहित मुदतीत माहिती पाठविली, परंतु त्यांची भेट न झाल्यामुळे टपाल परत आले. त्यानंतर पुन्हा त्यांना स्मरणपत्र पाठविले. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी श्री देसाई यांना माहिती देण्यात आली, परंतु एका मुद्दयाची माहिती त्यात

नसल्याचे श्री. देसाई यांनी निदर्शनास आणल्यानंतर ती माहितीही त्यांना घरपोच देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा सह. दुय्यम निबंधक वर्ग-२, करवीर क्र.४, कोल्हापूर श्री. सुंदर मदनराव जाधव यांनी संबंधित कागदपत्रांसह आयोगापुढील सुनावणीत स्पष्ट केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याला दुजोरा दिला. श्री. देसाई यांनी ही वस्तुस्थिती मान्य केली व माहिती मिळाल्यामुळे आपली तक्रार राहिलेली नसल्याचे स्पष्ट केले.

वरील परिस्थिती लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २९.१०.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय केरबा बिडकर
कोल्हापूर-सांगली रोड, के.डी.सी.सी. बँकेसमोर,
मु.पो.ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर शहर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७+१४८+१४९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दत्तात्रय केरबा बिडकर, कोल्हापूर-सांगली रोड, के.डी.सी.सी. बँकेसमोर, मु.पो.ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर डॉ. आनंद ब. जोगदंड

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर शहर, जि. कोल्हापूर श्री. अरुण पां. काकडे

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| कोल्हापूर / १४७ | दि. १.२.२००६ | दि. -- | दि. ११.५.२००६ | दि. २३.४.२००६ |
| कोल्हापूर / १४८ | दि. १.२.२००६ | दि. -- | दि. ११.५.२००६ | दि. -- |
| कोल्हापूर / १४९ | दि. १.२.२००६ | दि. ३.३.२००६ | दि. ११.५.२००६ | दि. २३.४.२००६ |

**अपील क्र. कोल्हापूर / १४७**

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

माहितीचा कालावधी दि. १ जानेवारी २००० ते ३१ जानेवारी २००६

१. जिल्हा उपनिबंधक यांचे कार्य, त्यांचे अधिकार, त्यांच्या अधिकारात येणारे उपनिबंधक, सहाय्यक निबंधक संख्या
२. उपनिबंधक, सहाय्यक निबंधक यांनी दिलेले निर्णय बदलणेचे अधिकार जिल्हा उपनिबंधक यांना आहेत काय, असल्यास कोणत्या सहकार कायद्यान्वये प्राप्त होतात तो कायदा, नियम तसेच कोणत्या शासन निर्णयानुसार प्राप्त झाले तो शासन निर्णय
३. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचा सन २००० ते ३१.१.२००६ अखेरचा वरिष्ठस्तर तपासणी अहवाल आणि शेरेबुकातील नोंदी
४. जिल्हा कार्यक्षेत्रातील संस्थांची यादी ५. जिल्हा कार्यक्षेत्रातील बंद संस्थांची यादी, या संस्था बंद पडण्यामागील कारणे, त्याबाबत कार्यालयाकडून झालेल्या कारवाईचा तपशील

**अपील क्र. कोल्हापूर / १४८**

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

माहितीचा कालावधी दि. १ जानेवारी २००० ते ३१ जानेवारी २००६

१. जिल्ह्यातील ऑडिटपात्र संस्थांची यादी.
२. लेखापरीक्षणांमध्ये अ,ब,क,ड वर्ग मिळालेल्या संस्थांची यादी.
३. ड वर्ग मिळालेल्या संस्था आणि त्यांच्यावर कार्यालयाकडून झालेली कारवाई, वर्गवारीची व्याख्या.
४. शासकीय आणि सी. ए. यांनी लेखापरीक्षण करुन सादर केलेले विशेष अहवाल आणि फौजदारी अहवाल संस्थांची सविस्तर यादी, अशा संस्थांवर कार्यालयाकडून झालेल्या कारवाईचा तपशील
५. जिल्हा व तालुका स्तरावरील मजूर सहकारी संस्थांची यादी, त्यांना शासकीय काम देण्याची तरतूद, मंजूर संस्थांना शासकीय गायरान मिळणेसाठी असणारी नियमावली, निकष आणि शासननिर्णयाची सविस्तर माहिती

**अपील क्र. कोल्हापूर / १४९**

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

माहितीचा कालावधी दि. १ जानेवारी १९९५ ते ३१ जानेवारी २००६

१. केंद्र व राज्य शासनाकडून अनुदानास पात्र संस्थांची यादी, गुणवत्तेनुसार कोणत्या संस्थांना किती अनुदान प्राप्त झाले त्यांची यादी, अनुदान प्राप्त संस्थांनी शासन भागभांडवल परतफेड केल्याचा तपशील.
२. नाबार्डकडून किती संस्थांना अर्थ सहाय्य प्राप्त झाले त्याच्या रकमांचा तपशील, त्याच्या परतफेडीचा तपशील
३. जिल्ह्यातील सर्वव स्तरावरील लेखपरीक्षकांची यादी

## विवेचन

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्य व त्यांचे अधिकार, उपनिबंधक व सहाय्यक निबंधक यांनी दिलेले निर्णय बदलण्याचे अधिकार जिल्हा उपनिबंधक यांना आहेत काय, असल्यास त्याबाबतचे आदेश, जिल्हा कार्यक्षेत्रातील बंद संस्थांची यादी, लेखापरीक्षण वर्गवारी, ड वर्ग मिळालेल्या संस्थांवर झालेल्या कारवाईचा वर्गवारीसह तपशील, विशेष अहवाल आणि अफरातफर झालेल्या संस्थांवरील कार्यवाहीचा तपशील, जिल्हा व तालुका स्तरावरील मंजूर संस्थेबाबतचा तपशील, केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त असलेल्या संस्थांची यादी, त्यांना दिलेले अनुदान, त्यांनी शासनाचे भाग भांडवल परत केल्याचा तपशील, नाबार्डकडून अर्थसहाय्य प्राप्त झालेल्या संस्थांच्या रकमेचा तपशील, जिल्ह्यातील सर्वच स्तरावरील लेखा परीक्षकांची यादी, जिल्हा कार्यक्षेत्रातील बंद संस्थांची यादी, त्या बंद पडण्याची कारणे व त्याबाबत उपनिबंधक कार्यालयाने केलेल्या कारवाईचा तपशील इत्यादी माहिती अपीलकर्ता श्री. दत्तात्रय केरबा बिडकर यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. ती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. बिडकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. अपिलांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने श्री. बिडकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. बिडकर यांनी माहिती मागणारे तीनही अर्ज एकाच दिवशी केले असून त्याबाबतची अपिलेही एकाच दिवशी केली आहेत.

श्री. बिडकर यांनी मागितलेली माहिती दि. १ जानेवारी १९९५ ते ३१ जानेवारी २००६ या कालावधीतील आहे.

श्री. बिडकर यांनी मागितलेली माहिती नेमकी नसून अत्यंत व्यापक स्वरुपाची आहे, त्यामुळे त्यांनी कार्यालयातील अभिलेखाचे निरीक्षण करुन आवश्यक ती कागदपत्रे मागितल्यास देता येतील, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. अभिलेख पाहण्याची गरज नाही, मागितलेली सर्व माहिती देण्यासाठी आवश्यक ते शुल्क कळवावे व माहिती द्यावी, असा आग्रह श्री. बिडकर यांनी धरला. तसे लेखी निवेदन त्यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे दिले, तसेच त्यानंतर दोन महिन्यांनी स्मरणपत्रही पाठविले व त्याचवेळी त्यांनी प्रथम अपील दाखल केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांचे अपील फेटाळले व 'मागणी केलेली माहिती व्यापक स्वरुपात असल्याने श्री. बिडकर यांनी कागदपत्रे पाहून झेरॉक्सचा खर्च भागवून माहिती प्राप्त करुन घ्यावी,' असा निर्णय तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. पी. डब्ल्यू. पाटील यांनी दिला. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयपत्रावर दि. २३.४.२००६ अशी तारीख आहे. अपिलाची सुनावणी दि. २२.५.२००६ रोजी झाली, त्याआधीच अपिलाचा निर्णय कसा दिला गेला, असा प्रश्न उपस्थित करुन श्री. बिडकर यांनी आधीच निर्णय तयार असल्याचा व त्यामुळे आपल्यावर अन्याय होत असल्याचा आरोप लेखी व आयोगापुढील सुनावणीतही केला. परंतु ही केवळ टंकलेखनाची चूक आहे, प्रथम अपिलाची सुनावणी दि. २२.५.२००६ रोजी झालेली असून आदेश दि. २३.५.२००६ रोजी पारित करण्यात आला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर डॉ. आनंद ब. जोगदंड यांनी स्पष्ट केले. सुनावणीच्या रोजनाम्याची प्रतही त्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी आयोगाला सादर केली. निकालपत्रातील तारीख चुकणे योग्य नाही, परंतु ही केवळ तांत्रिक चूक आहे, हे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

आपल्याला निःशुल्क माहिती मिळावी व माहिती देण्यास विलंब झाल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी श्री. बिडकर यांनी प्रथम अपिलाप्रमाणे आयोगापुढील सुनावणीतही केली. मात्र श्री. बिडकर यांनी तीनही अर्जांमध्ये मागितलेली माहिती

व्यापक व मोघम स्वरुपाची आहे, तसेच प्रत्येक अर्जाच्या संदर्भातील अधिकारीही वेगवेगळे आहेत, आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालयात २४ रिक्त पदे आहेत, त्यामुळे कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कार्यभार आहे, त्यातच बाजार समिती निवडणुकीसारख्या कार्यक्रमाची जबाबदारी या कार्यालयाला पार पाडावी लागली आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सुमारे दहा हजार सहकारी संस्था आहेत. त्यातील वर्गवारी व अर्जदाराने मागितलेला अन्य तपशील ही माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. माहिती नेमकेपणे व विशिष्ट संस्थांबाबत केली गेली असती तर ती त्वरित देणे शक्य होते. तसेच अभिलेखाची पहाणी करुन अर्जदाराने आवश्यक त्या नकलांची मागणी केली असती तर त्याही देणे सोईचे झाले असते, असे अपिलीय प्राधिकारी डॉ. जोगदंड यांनी नमूद केले. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्रति पानास २/- रुपये असे शुल्क न आकारता केवळ झेरॉक्स करण्याचा खर्च करुन माहिती घ्यावी असे कळविले आहे, याचाही डॉ. जोगदंड यांनी आवर्जून उल्लेख केला. मात्र सहकारी संस्थांच्या वर्गवारीनुसार याद्या तयार असतातच व सरकारकडे या प्रकारच्या सर्व नोंदी ठेवल्या जातात, या नोंदींची माहिती मागितली असल्याने ती मोघम व विस्तृत नाही, असे प्रतिपादन श्री. बिडकर यांनी केले. नियमानुसार योग्य ते शुल्क कळवूनच माहिती देणे आवश्यक होते, असा दावा श्री. बिडकर यांनी केला. सन १९९५ ते २००६ अशा सुमारे ११ वर्षांच्या कालावधीतील तपशिलाची माहिती सुमारे २५०० पानांच्या आसपास होईल, याची कल्पना श्री. बिडकर यांना दिली होती, असे अपिलीय प्राधिकारी डॉ. जोगदंड व जन माहिती अधिकारी श्री. अरुण पां. काकडे यांनी सांगितले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता श्री. बिडकर यांनी मागितलेली माहिती व्यापक आहे, हे स्पष्ट होते.

उपलब्ध मनुष्यबळ व साधनसामग्री लक्षात घेता जन माहिती अधिकारी माहिती नाकारु शकले असते, परंतु त्यांनी तसे केलेले नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे अभिलेखाची पाहणी करुन श्री. बिडकर यांनी आवश्यक माहिती घेणे अधिक योग्य ठरले असते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. अपीलकर्त्याने संबंधित अभिलेखाची पाहणी करुन आवश्यक असलेली कागदपत्रे योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावीत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ३०.१०.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. तुषार देविदास झेंडे
मु.पो.म्हसोबाची वाडी, ता. इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर, जि. पुणे — उत्तरवादी
श्री. डी. ए. वानखेडे

जन माहिती अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर, जि. पुणे
श्री. पी.एस.काळे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. तुषार देविदास झेंडे
मु.पो.म्हसोबाची वाडी, ता. इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर, जि. पुणे श्री. डी. ए. वानखेडे

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, इंदापूर, जि. पुणे श्री. पी.एस.काळे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. --- |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>१. मौजे निरगुडे ते म्हसोबाची वाडी या डांबरी रस्त्यावर शेतकऱ्यांनी पाईपलाईन टाकण्यासाठी किती जागेवर रस्ता खोदला आहे.<br>२. मौजे निरगुडे ते म्हसोबाची वाडी या दरम्यान खोदलेल्या रस्त्यासाठी शेतकऱ्यांकडून किती दंड वसुल करण्यात आला त्याचा तपशिल मिळावा.<br>३. शेतकऱ्यांनी याबाबत पूर्व परवानगी / अर्ज केले असतील तर त्याच्या नकला मिळाव्यात.<br>४. मौजे निरगुडे ते म्हसोबाची वाडी या डांबरी रस्त्याची साईडपट्टी खोदून म्हसोबाची वाडी गावासाठी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकली आहे. यासाठी किती दंड आकारण्यात आला त्याचा तपशिल मिळावा.<br>५. या रस्त्याच्या साईडपट्टीमधून पाईपलाईन टाकण्यासाठी आपणाकडे पूर्व परवानगी मागितली होती काय? त्याचा सविस्तर तपशिल मिळावा.<br>६. अंदाजे १ कि.मी. साईडपट्टी खोदलेली आहे. याबाबत आपण किती दंड आकारला आहे.<br>७. या रस्त्याची साईडपट्टी खोदल्यामुळे पावसाळ्यामध्ये ती साईड खचून अपघात होतील या अपघातासाठी जबाबदार कोण ?<br>८. रस्ता खोदल्यानंतर त्याची दंडाची आकारणी कशी केली जाते त्याचा सविस्तर खुलासा करावा. | |

## विवेचन

मौजे निरगुडे ते म्हसोबाची वाडी या डांबरी रस्त्यावर शेतकऱ्यांनी पाईपलाईन टाकण्यासाठी किती रस्ता खोदला आहे, साईडपट्टी खोदून म्हसोबाची वाडी गावासाठी टाकलेल्या पिण्याच्या

पाण्याच्या पाईपलाईन साठी पूर्वपरवानगी घेण्यात आली होती का व नसल्यास किती दंड आकारण्यात आला, या स्वरुपाची माहिती अपीलकर्ता श्री.तुषार देवीदास झेंडे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, उपविभाग, इंदापूर यांच्याकडे मागितली होती. चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्याच्या कारणावरुन श्री.झेंडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी (तत्कालीन गटविकास अधिकारी श्री.दिघे) आपला अपिलाचा विषय गंभीरपणे हाताळला नाही, निर्णय दिला नाही व अपील कोणाकडे करावे याचा पत्ताही दिला नाही, असे श्री.झेंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात म्हटले आहे.

श्री.झेंडे यांनी आठ मुद्यांची व रस्त्यातील खड्डे खोदल्यामुळे होणाऱ्या अपघातांना जबाबदार कोण, या स्वरुपाची आठ मुद्यांवरील माहिती विचारलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत त्यांना माहिती दिली होती, तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन त्यांच्या शंकांचे तोंडी निरसन केले होते, असे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, उपविभाग, इंदापूर यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. त्याने समाधान न झाल्याचे कळल्यावर माहिती देण्यात आली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. जन माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांनी श्री.झेंडे यांच्या अर्जाची दखल घेतली आहे, असे वरील माहितीवरुन स्पष्ट होते, मात्र तांत्रिक मुद्दयांवरुन श्री.झेंडे यांनी अपील केले आहे.

आयोगाचा आदेश खालीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**पुणे**
**दि. ३०.१०.२००७**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

comp२

17

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.वसंत ऊर्फ प्रल्हाद नारायण खाडे
रा.मु.पो.सांगरुळ, ता.करवीर, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ
व्दारा श्रीराम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कुडित्रे
(कुं.का.सह.साखर कारखाना साईट) ता.करवीर, जि. कोल्हापूर

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक संचालक व्यवसाय
शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, पुणे-५

(१) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक न्यू इंग्लिश स्कूल, खुपिरे,
ता.करवीर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

(२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीराम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कुडित्रे, ता.करवीर, जि.कोल्हापूर

(३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सांगरुळ हायस्कूल, सांगरुळ व भागशाळा आमशी, ता.करवीर जि. कोल्हापूर

(४) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीराम हायस्कूल कुडित्रे व भागशाळा कोपार्डे, व ज्युनिअर कॉलेज, कुडित्रे, ता.करवीर जि. कोल्हापूर

(५) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ व्दारा श्रीराम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कुडित्रे, ता.करवीर. जि.कोल्हापूर

(६) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, स.ब.खाडे महाविद्यालय, कोपार्डे, ता.करवीर, जि.कोल्हापूर

(७) जन माहिती अधिकारी तथा अभिलेख अधीक्षक,
श्रीराम हायस्कूल व तांत्रिक विभाग व श्रीराम ज्युनिअर कॉलेज, व्होकेशनल विभाग, कुडित्रे, ता.करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७+२८+२९+३०+३१+४४+४५+४९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत ऊर्फ प्रल्हाद नारायण खाडे, रा.मु.पो.सांगरुळ, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव, सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ,
व्दारा श्रीराम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कुडित्रे
(कुं.का.सह.साखर कारखाना साईट) ता.करवीर, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक न्यू इंग्लिश स्कूल, खुपिरे,
ता.करवीर, जि.कोल्हापूर

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| कोल्हापूर/२७ | १९.१२.२००५ | १६.१.२००६ | १४.४.२००६ | |
| कोल्हापूर/२८ | २०.१२.२००५ | ३.१.२००६ | १४.४.२००६ | |
| कोल्हापूर/२९ | २०.१२.२००५ | ४.१.२००६ | १४.५.२००६ | |
| कोल्हापूर/३० | २८.१.२००६ | ४.१.२००६ | २५.४.२००६ | |
| कोल्हापूर/३१ | १३.२.२००६ | ३.१.२००६ | २५.४.२००६ | |
| कोल्हापूर/४४ | १५.४.२०६ | -- | ३१.५.२००६ | |
| कोल्हापूर/४५ | ८.३.२००६ | -- | ११.५.२००६ | |
| कोल्हापूर/४९ | २.१२.२००५ | १३.१.२००६ | ३०.३.२००६ | |

८ <u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>

**अपील क्र. कोल्हापूर/२७ + २८ + २९**

(१)आपल्या हायस्कूलमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नेमणुकीबाबत सन १९८३ ते २००४ पर्यंत संस्थेच्या कार्यकारी मंडळाने /समन्वय समितीने सादर केलेले प्रस्ताव व त्यासोबतची कागदपत्रे व त्यावरील आदेश

(२)आपल्या हायस्कूलला देण्यात आलेले वेतन व वेतनेतर अनुदानाच्या रकमा व त्यांचे आदेशाची प्रत.

**अपील क्र. कोल्हापूर/३०**

(१)आपल्या ज्युनिअर कॉलेजमध्ये मधील सेवक नेमणुकीबाबत सन १९८३ ते २००४ पर्यंत संस्थेच्या कार्यकारी मंडळाने /समन्वय समितीने सादर केलेले प्रस्ताव व त्यासोबतची कागदपत्रे व त्यावरील आदेश

(२)सदर कॉलेजला देण्यात आलेले वेतन व वेतनेतर अनुदानाच्या रकमा व त्या कोणास देण्यात आल्या त्यांची नावे.

**अपील क्र. कोल्हापूर/३१**

(अ)(१)आपल्या ज्युनिअर कॉलेजमधील सेवक नेमणुकीबाबत सन १९८५ ते २००४ पर्यंत संस्थेच्या कार्यकारी मंडळाने /समन्वय समितीने सादर केलेले प्रस्ताव व त्यासोबतची कागदपत्रे व त्यावरील आदेश

(२)सदर कॉलेजला देण्यात आलेले वेतन व वेतनेतर अनुदानाच्या रकमा व त्या कोणास देण्यात आल्या त्यांची नांवे.

(३)आपले नांवे आलेल्या एमझेडडी-९४८१ या जीपचा ती घेतलेपासूनचा कि.मी. तपशील व तीवर झालेल्या खर्चाचा तपशील.
(ब)(१)आपल्या शाळेचे शासकीय अनुदान उभारणीचे तपशीलवार तक्ते.
(२)संस्थेच्या शाखांच्या (शाळांच्या )इमारत बांधकामासाठी सर्व सेवकांकडून निधी गोळा करण्यासाठी संस्थेने केलेल्या मागणीचा तपशील व त्यानुसार आपल्या शाळेतील / ज्युनि. कॉलेजमधील सेवकांकडून इमारत निधी कपात केलेल्या पगारपत्रकांच्या नकला.
(३)आपल्या शाळेच्या इमारत बांधकामासाठी केलेल्या जमाखर्चाचा तपशील.

**अपील क्र. कोल्हापूर/४४**

स.ब.खाडे महाविद्यालय, कोपार्डे, ता.करवीर, जि.कोल्हापूर मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नेमणुकीबाबत (अ)सन १९८५ ते २००४ पर्यंत संस्थेच्या कार्यकारी मंडळाने /समन्वय समितीने सादर केलेले प्रस्ताव व त्यासोबतची कागदपत्रे व त्यावरील आदेश
(ब)सदर कॉलेजला देण्यात आलेले वेतन व वेतनेतर अनुदानाच्या रकमा व त्या कोणास देण्यात आल्या त्यांची नावे.

**अपील क्र. कोल्हापूर/४५**

(१)आपल्या संस्थेच्या सन १९८६-८७ ते २००५-२००६ या काळातील निवडणुकीनंतरच्या काळात संस्थेने स्थापन केलेल्या समन्वय समितीच्या आणि त्या समितीतील पदाधिकाऱ्यांची नावे, (२)सन १९९९० ते २००५ मध्ये संस्थेच्या सर्व शाखातील सेवकाचे कडून शाखांचे इमारत बांधकामासाठी जमा झालेला शाखावार इमारत निधी व त्याचा विनियोगाचा तपशील. (३)स.ब.खाडे महाविद्यालयात दि.१५.७.१९९१ ते २१.८.१९९१ काळातील इनचार्ज प्राचार्य यांच्या अधिकाराचा ठरावासह तपशील, (४)कार्यकारिणीच्या दि.२२.८.१९९१ च्या सभेतील विषय क्र.६ व त्यानुसार झालेल्या ठराव क्र.६ ची नक्कल (५) दि.१मे २००० ते दि.३१मे २००५ या कालखंडात नेमलेल्या प्राचार्यांच्या नेमणुकी संदर्भात संस्थेने केलेल्या ठरावासहच्या कागदपत्रांच्या नकला. तसेच त्यांचा दरमहाचा पगार, त्याला शासनमान्यता आहे का? नसल्यास त्यांचा पगार कोठून देण्यात आला त्याचा तपशील. (६)संस्थेने तृतीय वर्ष स्पे.भूगोल विषय कायमचा बंद करणेसाठी शिवाजी विद्यापीठाविरुध्द दिवाणी न्यायालयात दाखल केलेला दावा, व्यवस्थापन बैठकीत झालेला निर्णय, अतिरिक्त जिल्हा न्यायालयात केलेले अपील, अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश कोल्हापूर यांच्या निकालावर मुंबई उच्च न्यायालयात केलेले अपील यांच्या नकला, यासाठी झालेला न्यायालयीन व इतर खर्चाचा तपशील. (७)मुख्याध्यापक, श्रीराम हायस्कूल यांचे नांवे घेतलेल्या एमझेडजी ९४०१ या जीपचा खरेदीपासूनचा (डिझेल, दुरुस्ती, रनिंग)खर्चाचा तपशील.

**अपील क्र. कोल्हापूर/४९**

(१)श्रीराम हायस्कूल तांत्रिक विभाग, (२)औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोपार्डे, (३)श्रीराम ज्युनि.कॉलेज व्होकेशन विभाग, कुडित्रे येथील (अ)अ.नं.१ व २ सन १९८४ आणि अ.नं.३ सन १९८९ ते २००४ पर्यंत संस्थेच्या कार्यकारी मंडळाने /समन्वय समितीने सादर केलेले प्रस्ताव व त्यासोबतची कागदपत्रे व त्यावरील आदेश
(२)संस्थेच्या शाखांना देण्यात आलेले वेतन व वेतनेतर अनुदानाच्या रकमा व त्या कोणास देण्यात आल्या त्यांची नांवे.

## विवेचन

श्री.वसंत ऊर्फ प्रल्हाद नारायण खाडे यांनी 'सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ' या संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालये यांच्या संदर्भातील माहिती मागणारे अनेक अर्ज त्या त्या शाळांचे / महाविद्यालयांचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्याकडे केले होते. या अर्जांमध्ये मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे किंवा अपुरी मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ, व्दारा श्रीराम हायस्कूल व ज्युनि.कॉलेज, कुडित्रे, (कुं.का.सह.साखर कारखाना साइट), ता.करवीर, जि.कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. त्या अपिलाच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे किंवा अपिलाची दखलच न घेतल्याच्या कारणावरुन श्री.खाडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत. तीन अपिलांमध्ये (कोल्हापूर / १४७+१४८+१४९) माहिती मिळून तक्रार राहिली नसल्याचे त्यांनी कळविल्यामुळे आयोगाने सदर अपिले निकाली काढली आहेत. अन्य आठ अपिलांची (२७+२८+२९+३०+३१+४४+४५+४९/ कोल्हापूर) एकत्रित सुनावणी दि.२२.१०.२००७ रोजी कोल्हापूर येथे घेण्यात आली. त्याचबरोबर यातच संस्थेच्या संदर्भात श्रीराम हायस्कूलचा तांत्रिक विभाग व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोपार्डे व श्रीराम ज्युनि.कॉलेज व्होकेशन विभाग, कुडित्रे या शाखांमधील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, घोलेपथ, पुणे-५ यांच्याकडे माहितीची मागणी केलेल्या व त्यांनी संस्थेकडे पाठविलेल्या विषयावरील अपिलाचीही (अपील क्र.४९/कोल्हापूर) सुनावणी घेण्यात आली.

श्री.खाडे हे सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ, व्दारा श्रीराम हायस्कूल व ज्युनि.कॉलेज, कुडित्रे (कुं.का.सह.साखर कारखाना साइट), ता.करवीर, जि.कोल्हापूर या संस्थेचे माजी संचालक आहेत. विद्यमान संचालक व श्री.खाडे यांच्यातील वादाची पार्श्वभूमी या सर्व अर्ज व अपिलांना आहे. या वादामधून श्री.खाडे संस्थेकडे,तसेच शिक्षण संचालनालयाकडे विविध प्रकारच्या तक्रारी व अर्ज करीत आहेत, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

श्री.खाडे यांचे सभासदत्व रद्द केल्यामुळे त्रास देण्याच्या हेतूने ते अशा प्रकारचे मोठ्या प्रमाणावर अर्ज व खोट्यानाट्या तक्रारी करीत असतात, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक / प्राचार्य व अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ, यांनी सांगितले. 'श्री.खाडे हे या संस्थेत बरीच वर्षे शिक्षक होते. सदर संस्थेच्या कार्यकारी मंडळात देखील ते १९९१ पर्यंत खजानिस म्हणून काम पहात होते. त्या कालावधीत संस्थेच्या व संस्थेच्या शाळांच्या कामकाजाबाबत त्यांची कोणतीही तक्रार नव्हती. १९९६ मध्ये, ते सेवानिवृत्त झालेले आहेत. संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या १९९१ च्या निवडणुकीत त्यांनी स्वतःचे स्वतंत्र पॅनेल उभे केले होते. त्यात ते पराभूत झाले. त्यानंतर व नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी संस्था व शाळांच्या हिताविरुध्द सातत्याने निरनिराळ्या ठिकाणी खोट्या तक्रारी करुन खोटी कज्जे खेकटी करुन नाहक त्रास देऊन संस्थेची व कार्यकारी मंडळ व पदाधिकाऱ्यांची बदनामी करुन शाळांच्या व संस्थेच्या कामकाजात सातत्याने अडथळे आणलेले आहेत. संस्था, संस्थेचे कार्यकारी मंडळ व पदाधिकारी यांच्याविरुध्द त्यांना वैयक्तिक आकस आहे. संस्था व शाळांच्या विरोधात त्यांनी आजअखेर निरनिराळ्या कोर्टात जवळ जवळ २० ते २५ दावे / अपिले / अर्ज दाखल केले असून अद्यापी तसे करणे सुरुच आहे. त्यात त्यांना कोणतेही यश आलेले नाही. संस्थेच्या हिताविरुध्द त्यांनी वर्तन केलेने संस्थेच्या ता.३०.४.१९९६ च्या वार्षिक सभेत त्यांचे सभासदत्वही रद्द केलेले आहे. त्यांनी माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग करुन संस्थेकडून व संस्थांच्या शाळांकडून जबरदस्तीने व धमकी देऊन कागदपत्रांची माहिती मागितलेली आहे,' असे अपिलीय प्राधिकारी तथा सचीव

श्री.जे.डी.आसगांवकर यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. 'संस्थेच्या सर्व शाखांचे कामकाजावर शिक्षण खात्याचे व संस्थेच्या कारभारावर धर्मादाय आयुक्तांचे नियंत्रण असते. त्यांच्याकडून होणाऱ्या कोणत्याही चौकशीला सामोरे जाण्यास संस्था तयार आहे,' असेही श्री.आसगांवकर यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले.

संस्थेविरुध्द आपण अनेक तक्रारी व दावे केले आहेत हे खरे आहे, परंतु संस्थेच्या हितासाठीच आपण याप्रकारे संघर्ष करीत आहोत, यामागे कोणताही स्वार्थी उद्देश नाही, असे श्री.खाडे यांनी स्पष्ट केले.

श्री.खाडे यांनी मागितलेली माहिती सन १९८३ ते २००४ अशा २१ वर्षांच्या कालावधीतील आहे. संस्थेच्या कार्यकारी मंडळाने / समन्वय समितीने सादर केलेले प्रस्ताव, त्यासोबतची कागदपत्रे व त्यावरील आदेश, संस्थेच्या शाखांना मिळालेले वेतन व वेतनेतर अनुदान, इमारत बांधकामासाठी सेवकांकडून केलेल्या निधी मागणीचा तपशील, इमारत निधी कपात केलेल्या पत्राच्या नकला, इमारत निधीच्या जमाखर्चाचा तपशील, जीप खरेदी केल्यापासून झालेल्या वापराचा व जीपवरील खर्चाचा पूर्ण तपशील इत्यादी माहितीचा त्यात समावेश आहे. यातील काही माहिती त्या त्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी दिली व (अ) विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे देणे अशक्य (ब) न्यायालयात चालू असलेल्या दाव्यांमुळे देणे अशक्य अशा कारणांवरुन काही माहिती नाकारली. त्याविरुध्द अपिलीय प्राधिकारी तथा संस्थेचे सचीव यांच्याकडे श्री.खाडे यांनी केलेल्या अपिलांची दखल घेण्यात आली नाही किंवा या अपिलांमधूनही आवश्यक ती माहिती दिली गेली नाही, असे श्री.खाडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात म्हटले आहे. सुनावणीतही त्यांनी ते तपशीलवार सांगितले. अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, घोले पथ, पुणे-४११ ००५ यांचेकडील सुनावणीचे वेळी श्री.खाडे उपस्थित राहिले नाहीत, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले.

शक्य तेवढी माहिती श्री.खाडे यांना दिली आहे, असे संस्थेचे सचीव श्री.आसगांवकर यांनी सांगितले. श्री.खाडे यांचे सातत्याने येणारे अर्ज व सन १९८३ पासूनची विस्तृत माहितीची मागणी

यामुळे काही माहिती देण्यास विहित मुदतीपेक्षा विलंब झाला आहे, हे श्री.आसगावकर यांनी मान्य केले, मात्र संस्थेचे नियमित कामकाज सांभाळून एवढी विस्तृत माहिती द्यावी लागत असल्यामुळे व यांतील अनेक कागदपत्रे न्यायालयीन दाव्यांचा संदर्भात दाखल केलेली असल्यामुळे हा विलंब झाल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. मात्र न्यायालयात पुरावे म्हणून आपल्याला कागदपत्रे उपलब्ध होऊ नयेत म्हणून हेतुत: विलंब केला गेला, अनेकदा आपले टपालही स्वीकारले गेले नाही, असे प्रतिपादन श्री.खाडे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता, आपापसातील वादाचा एक भाग म्हणून माहितीच्या अधिकाराचा वापर केला जात आहे, असे स्पष्ट होते. नागरिकाला माहिती मागणीचा अधिकार असला तरी तारतम्याने त्याचा वापर होतो की नाही, हेही विचारात घेणे आवश्यक आहे. व्यक्तिगत समस्येच्या निराकरणाचे त्यातील महत्व लक्षात घेतानाच, सार्वजनिक हिताचा संदर्भही नजरेआड करता येणार नाही. केवळ आपापसातील वादापोटी शह-प्रतिशहाचा एक भाग म्हणून माहितीच्या अधिकाराचा अवलंब करणे हे या व्यापक अधिकाराचा संकुचित विचार करण्यासारखे, व म्हणूनच त्याच्या गांभीर्याच्या व परिणामकारकतेच्या दृष्टीने अहिताचे ठरेल. ते होणे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या उद्दिष्टांशी सुसंगत नाही, एवढेच नव्हे, तर त्याला मारक आहे. मात्र याबरोबरच केवळ गैरवापराचे वा सूडबुध्दीने वापर केला जात असल्याचे अथवा मागितलेली माहिती फार विस्तृत असल्याचे कारण दाखवून देय माहिती नाकारण्याची वा माहिती-मागणी अर्जांच्या हाताळणीत दिरंगाई व कुचराई करण्याची प्रवृत्तीही समर्थनीय नाही केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या मूळ उद्दिष्टांना ती मारक असल्यामुळे तीही मान्य करता येणार नाही. अशा स्थितीत प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अधिक दक्षतापूर्वक जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे. ती तशी पार पाडली जाते की नाही, याचीही दखल घ्यावी लागेल.

वरील विवेचनाच्या अनुषंगाने व उभय बाजूंची निवेदने विचारात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्ता व संबंधित संस्थेचे जन माहिती अधिकारी, तसेच अपिलीय प्राधिकारी यांना केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या (वरील विवेचनात नमूद केलेल्या अपेक्षेनुसार) रास्त कार्यवाहीची जाणीव करुन देण्यात येत आहे.

(३) संबंधित शाळा / महाविद्यालय यांचे मुख्याध्यापक / प्राचार्य हे जन माहिती अधिकारी व संबंधित संस्थेचे सचीव / अध्यक्ष हे प्रथम अपिलीय प्राधिकारी अशी व्यवस्था शिक्षण खात्याने मूळ व्यवस्था बदलून [शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण /२००५ /फेमाअ/ २५-क(०८), ७१५२० / ५९४, दि.३०.८.२००६ अन्वये] केलेली आहे. शिक्षण क्षेत्रातील वास्तव लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक / प्राचार्य हे संस्थेचे अपिलीय प्राधिकारी तथा सचीव /अध्यक्ष यांच्या मान्यतेशिवाय केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खालील अर्जावरील निर्णय करीत नाहीत, असे विविध अपिलांबाबतच्या परिस्थितीवरुन दिसते. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील माहितीच्या खुलेपणाच्या व सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या गाभाभूत तत्त्वाला ही स्थिती मारक आहे. हे लक्षात घेता शिक्षण संचालकांनी या व्यवस्थेबाबत फेरविचार करणे आवश्यक आहे. या केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या यथार्थ अंमलबजावणीच्या दृष्टीने अशा प्रकारची कार्यवाही करुन योग्य व्यवस्था प्रस्थापित करण्याची सूचना शिक्षण संचालकांना देण्यात येत आहे. शिक्षणसंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी याविषयीच्या कार्यवाहीचा अहवाल दि.३०.११.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(४) श्री.खाडे यांनी मागितलेली माहिती देण्याचा प्रयत्न सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ या संस्थेचे विविध जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा सचीव यांनी काही प्रमाणात केला असला तरी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जबाबदारी पूर्णपणे पार पाडलेली नाही. सार्वजनिक प्राधिकरणप्रमुख हेच जन माहिती अधिकारी आहेत अशी याबाबतची वस्तुस्थिती असल्यामुळे सांगरुळ शिक्षण संस्था,

सांगरुळ या प्राधिकरणाला केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या पायमल्लीबद्दल रुपये १०,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) ' या लेखाशिर्षाखाली या शास्तीची रक्कम जमा करुन तसा पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा.

(५) केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या मूळ उद्दिष्टाला व गाभ्याला मारक ठरु नये अशा प्रकारे व तारतम्याने माहितीच्या अधिकाराचा अवलंब करावा अशी समज अपीलकर्ता श्री.वसंत ऊर्फ प्रल्हाद नारायण खाडे यांना देण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**

**दि.** 31-10-2006

प्रत:शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे-१ यांनी आदेशातील क्र.३ ची नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग), यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे १

श्री.मोहद्दीन महमद बिराजदार
रा.खानापूर, पो. म्हैसलगी,
ता.अक्कलकोट, जि. सोलापूर — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.९.२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मोहद्दीन महमद बिराजदार, रा. खानापूर, पो. म्हैसलगी, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. प्रदीप सदाशिव मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. तानाजी हरिबा घाडगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.३.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

उर्दू मदतशाळा, खानापूर, ता. अक्कलकोट या शाळेतील श्री. काझी यांच्या शिक्षक मान्यतेचे दि. २६.१०.१९९२, १.६.१९९४, १.६.१९९५, १६.१२.१९९६ रोजीचे आदेश व वेळोवेळी ठेवलेल्या कार्यालयीन टिप्पणीच्या नकला, श्रीमती वळसंगकर यांचा दि.३०.६.१९९६ ते शैक्षणिक वर्षाकरता दि.१६.१२.१९९६ रोजीच्या आदेशाची नक्कल व कार्यालयीन टिप्पणी, श्री.काझी यांना १९९३-९४, १९९४-९५ साली बोनस अदा केलेल्या बिलाच्या नकला.

## विवेचन

उर्दू मदत शाळा, खानापूर, ता. अक्कलकोट, जि.सोलापूर येथील श्री. काझी यांच्या शिक्षक मान्यतेचे शिक्षण खात्याचे चार दिनांकाचे आदेश, त्याविषयीच्या कार्यालयीन टिप्पण्या, बोनस व पगार बिलाच्या नकला, त्यांच्या वेतनवाढीबाबतचे संस्थेचे ठराव व ते नसल्यास ठरावाशिवाय वेतनवाढ मंजूर कशी केली याचा खुलासा, श्रीमती वळसंगकर यांच्याबाबतच्या आदेशाची नक्कल अशी माहिती अपीलकर्ता श्री.मोहद्दीन महमद बिराजदार यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८ (१) (जे) अन्वये (सार्वजनिक हिताशी निगडीत नसलेली व्यक्तिगत माहिती म्हणून ) ती नाकारण्यात आली. त्याविरुध्द त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. श्री.मोहद्दीन महमद बिराजदार हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत. त्यांनी शाळेचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापकांकडून ही माहिती घ्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी यांनी दिला. त्याविरुध्द श्री. बिराजदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. बिराजदार हे उर्दू मदत शाळा या संस्थेचे अध्यक्ष आहेत. आपल्याच शाळेतील दोन शिक्षकांबाबतची माहिती त्यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे मागितली आहे. त्याला संस्थांतर्गत शिक्षकाबरोबरच्या वादाची पार्श्वभूमी आहे. मात्र ही माहिती देण्याने कोणतेही सार्वजनिक हित साधत नसल्यामुळे वैयक्तिक म्हणून ती देता येणार नाही, ही जन माहिती अधिकारी यांची व अपिलीय प्राधिकारी यांनी ग्राह्य मानलेली भूमिका योग्य नाही. तत्वत: शिक्षणसंस्थेच्या कामकाजाच्या अनुषंगाने ती मागणे समर्थनीय आहे व शिक्षणविभागातील कारभाराच्या संदर्भात ती सार्वजनिकरीत्या उपलब्ध असणे आवश्यक आहे. परंतु संबंधित वादाचा एक भाग म्हणूनच वादातील उभय बाजू केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा वापर करु पहात असल्याचे आयोगापुढे यापूर्वीही स्पष्ट झाले आहे. तसेच आता वादाचा संदर्भ राहिला नसल्याचे नमूद करून श्री. मोहद्दीन महमद बिराजदार यांनी माहितीबाबत आग्रह धरला नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनीही 'वादाची गुंतागुंत नसल्यामुळे आता माहिती देता येणे शक्य' असल्याचे प्रतिपादन केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध माहिती एक आठवड्याच्या आत द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या दिवशीच (दि.२७.९.२००७) दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल दि.१५.१०.२००७ पर्यंत आयोगाला पाठवावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ६.१०.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती सावित्राबाई सुखदेव यादव,
रा. मु.पो. तावशी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती सावित्राबाई सुखदेव यादव,
रा. मु.पो. तावशी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. सिध्दाराम सालीमठ

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
श्री. बी. बी. वाघमोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.६.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.९.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

स्वातंत्र्य सैनिकाची विधवा पत्नी म्हणून मिळणारे निवृत्ती वेतन मिळण्याच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती व दि. ५.०१.२००४ रोजी केलेला अर्ज व त्यासोबतची सर्व कागदपत्रे

## विवेचन

स्वातंत्र्य सैनिकाची विधवा पत्नी म्हणून मिळणारे निवृत्ती वेतन मिळण्याच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती श्रीमती सावित्राबाई सुखदेव यादव यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे चिटणीस, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. ही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील केले. काही माहिती दिली असल्याचे नमूद करुन व उर्वरित माहिती देऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी हे अपील निकाली काढले. परंतु आपल्याला संबंधित पूर्ण कागदपत्रे मिळाली नसल्याच्या कारणावरुन श्रीमती यादव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दिवंगत स्वातंत्र्य सैनिक सुखदेव नामदेव यादव यांची आपण विधवा पत्नी असून आपल्याला दि. २८.२.२००४ रोजी निवृत्ती वेतन मंजूर करण्यात आले व जून २००४ पर्यंत आपण ते घेतले. त्यानंतर ते बंद करण्यात आले. हे निवृत्ती वेतन पूर्ववत चालू ठेवण्याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी राज्य शासनाशी केलेला संपूर्ण पत्रव्यवहार, जिल्हाधिकाऱ्यांशी आपण स्वतः केलेला पत्रव्यवहार व जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही अशी माहिती आपण मागितली होती. परंतु ती मिळाली नाही, असे श्रीमती यादव यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. आपली परिस्थिती हलाखीची असून आपली उपासमार होत आहे म्हणून आपल्याला त्वरित निवृत्ती वेतन सुरु करावे, अशी श्रीमती यादव यांची मुख्य मागणी आहे. त्यासाठी विविध पातळ्यांवर त्या प्रयत्न करीत आहेत.

त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी तत्परतेने दिली नाही, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या निर्णयपत्रात नोंदविले आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी शासनाकडील पत्रानुसार कार्यवाहीबाबत शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती विहित वेळेत प्राप्त झाल्या नसल्याने दिल्या नसल्याचे व उर्वरित माहिती दिली असल्याचे या निर्णयपत्रात म्हटले आहे. श्रीमती यादव यांनी कै. सुखदेव यादव यांच्या कायदेशीर वारस असल्याचा पुरावा, तसेच न्यायालयाचा वारस दाखला सादर करावा. त्यानंतरच स्वातंत्र्य सैनिकाची विधवा पत्नी म्हणून त्यांना निवृत्ती वेतन सुरु करण्याची कार्यवाही केली जाईल, असे अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी श्रीमती यादव यांना कळविले. पूर्ण चौकशी होऊन आपल्याला निवृत्ती वेतन सुरु करण्यात आले होते, त्यामुळे आता नव्याने वारस दाखला देण्याची गरज नाही, असे श्रीमती यादव यांचे म्हणणे आहे. परंतु हा सर्व विषय केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. त्यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे, त्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २५.१०.२००७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

कु. प्रेमा सुभाष कोणजी
मु. पो. माळवणी (नायकाची), ता. पंढरपूर, जि.सोलापूर    अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ),
जिल्हा परिषद, सोलापूर    उत्तरवादी

जा माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** कु. प्रेमा सुभाष कोणजी, मु. पो. माळवणी (नायकाची ), ता. पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. पी. एस. मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. टी. एच. घाडगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

सोलापूर जिल्हा परिषदेतील विशेष मागास प्रवर्ग शिक्षकांचे निवड प्रवर्ग, निवड दिनांक, आज अखेर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांची संवर्गासह यादी

## विवेचन

सोलापूर जिल्हा परिषदेच्या विशेष मागास प्रवर्गातील शिक्षकांची मंजूर पदे २०५ असून कार्यरत पदे २४६ आहेत. त्याची संवर्गासह तपशीलवार माहिती अपीलकर्त्या कु. प्रेमा सुभाष कोणजी यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जिल्ह्यातील अकरा तालुक्यांचे गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती यांच्या कार्यालयाकडे माहिती उपलब्ध असल्यामुळे (व त्या कार्यालयांचे माहिती अधिकारी म्हणून ) जन माहिती अधिकाऱ्यांनी हा अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला व माहिती त्यांच्याकडून घ्यावी, असे कु. कोणजी यांना कळविले. अकरा तालुक्यांपैकी पंढरपूर, करमाळा, उत्तर सोलापूर, माढा, माळशिरस, सांगोला या सहा तालुक्यांची माहिती मिळाली व अक्कलकोट, बार्शी, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर व मोहोळ या पाच तालुक्यांची माहिती मिळाली नाही व मिळालेली माहिती सदोष आहे, (उदा. खुल्या संवर्गातील व्यक्तींची नोंद इतर मागास वर्ग / विशेष मागास प्रवर्गात असणे ) म्हणून अपिलीय प्राधिकारी व शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही. एवढेच नव्हे, तर कारवाईची धमकी देऊन आपल्याला त्यांच्या कक्षातून हाकलून लावले, अशी तक्रार करुन कु. कोणजी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

कु. कोणजी यांनी याच विषयाच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराखाली व अन्य अर्जही केले आहेत. त्या सुनावणीला हजर राहिल्या नाहीत, असे जन माहिती अधिकारी श्री. टी.एच. घाडगे व अपिलीय प्राधिकारी श्री. पी.एस. मोरे यांनी सांगितले. मात्र आपल्याला सुनावणीची पूर्वसूचना मिळाली नाही, असे कु. कोणजी व त्यांच्या वतीने उपस्थित असलेले प्रतिनिधी श्री. अ.वि. म्हेत्रे यांनी सांगितले. सुनावणीच्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी श्री. घाडगे यांनी आयोगापुढील सुनावणीत सादर केली. मात्र अन्य अपिलाच्या सुनावणीच्या संदर्भातील हे पत्र असल्याचे कु. कोणजी व श्री. म्हेत्रे यांनी स्पष्ट केले. सुनावणीबाबत पाठविलेल्या स्मरणपत्राची प्रतही जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर केली. परंतु आपल्याला हे पत्र मिळालेले नाही. एवढेच नव्हे, तर संबंधित लिपिकांना व अधिकाऱ्यांना भेटण्याचा आपण वारंवार प्रयत्न केला, परंतु प्रत्येक वेळी पुढची मुदत देऊन व अन्य अधिकाऱ्याचे नाव सांगून टोलवाटोलवी करण्यात आली, असे कु. कोणजी व श्री. म्हेत्रे यांनी सांगितले. संबंधित लिपिक यावेळी उपस्थित होते. श्री. म्हेत्रे यांच्या प्रतिपादनाचा त्यांनी इन्कार केला. परतुं त्याबाबतचा श्री. म्हेत्रे यांनी दिलेला तपशील पाहता कु. कोणजी व श्री. म्हेत्रे यांच्या म्हणण्यामध्ये तथ्य असल्याचे दिसते. कु. कोणजी यांनी उप शिक्षकांच्या सरळ सेवा भरतीच्या संदर्भात आत्मदहनाचा इशारा दिला होता, त्यामुळे आपण पोलिसांनाही त्याबाबत कळविले होते. परंतु त्या गावात नसल्याचे पोलिसांनी लेखी कळविले असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले. पोलिस अधीक्षकांचे त्यावेळचे पत्र त्यांनी सादर केले. या पत्रानुसार त्या गावात उपस्थित नसल्यामुळे अपिलाबाबत त्यांच्याशी संपर्क साधता आला नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितले. याबाबतचा समाधानकारक खुलासा श्री. म्हेत्रे व कु. कोणजी करु शकले नाहीत.

पंढरपूर, करमाळा, उत्तर सोलापूर, माढा, माळशिरस, सांगोला या सहा तालुक्यांची माहिती पूर्वीच देण्यात आली असून उर्वरित अक्कलकोट, बार्शी, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर व मोहोळ या पाच तालुक्यांची माहिती तयार आहे, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितले. सुनावणीनंतर ही माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना दिली व ही माहिती आपल्याला मिळाली असून आपली काहीही तक्रार नाही, असे लेखी निवेदन कु. कोणजी यांनी आयोगाला सादर केले आहे.

कु. कोणजी यांचा मूळ अर्ज दि. १७.८.२००६ चा असून संपूर्ण माहिती त्यांना दि. २७.९.२००७ रोजी देण्यात आली आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत संबंधित गट

ऱ्यांकडे अर्ज वर्ग केल्यानंतर पंढरपूर, करमाळा, उत्तर सोलापूर, माढा, माळशिरस, सहा तालुक्यांच्या गट शिक्षण अधिकाऱ्यांनी माहिती विहित मुदतीत दिली आहे व बार्शी, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, व मोहोळ या पाच तालुक्यांच्या गट शिक्षण माहिती विहित मुदतीत दिली नाही. कु. कोणजी यांना सुनावणीचे पत्र मिळाले की नाही, ाठी त्यांनी नमूद केलेल्या पत्यावर त्या उपलब्ध होत्या की नाही, याबाबत उलटसुलट केले गेले व कागदपत्रे उभय बाजूंनी सादर केली. त्यावरून विलंबाला उभय बाजू त, असे स्पष्ट होते. मात्र अक्कलकोट, बार्शी, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर व मोहोळ या या गट शिक्षण अधिकाऱ्यांनी आयोगापुढील सुनावणीपूर्वी तत्परतेने व विहित मुदतीत ती, त्यामुळे कु. कोणजी यांना अपुरी व विलंबाने माहिती मिळाली. संबंधित गट ाऱ्यांनी चूक केली असून, त्याबाबत त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून दहा ण आयोगाला अहवाल सादर करू, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी ल्हा परिषद, सोलापूर यांनी आयोगापुढील सुनावणीत मान्य केले.

बाजूंची निवेदने व कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

मान्य.

मुदतीत माहिती न देण्याऱ्या अक्कलकोट, बार्शी, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, व तालुक्यांच्या गट शिक्षण अधिकाऱ्यांवर केलेल्या प्रशासकीय कारवाईची नोंद त्यांच्या ालात व सेवा पुस्तकात घ्यावी. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याबाबतचा पूर्तता अहवाल २०.१०.२००७ पर्यंत सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

०७

शिक्षण अधिकाऱ्यांकडे अर्ज वर्ग केल्यानंतर पंढरपूर, करमाळा, उत्तर सोलापूर, माढा, माळशिरस, सांगोला या सहा तालुक्यांच्या गट शिक्षण अधिकाऱ्यांनी माहिती विहित मुदतीत दिली आहे व अक्कलकोट, बार्शी, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, व मोहोळ या पाच तालुक्यांच्या गट शिक्षण अधिकाऱ्यांनी माहिती विहित मुदतीत दिली नाही. कु. कोणजी यांना सुनावणीचे पत्र मिळाले की नाही, माहिती देण्यासाठी त्यांनी नमूद केलेल्या पत्यावर त्या उपलब्ध होत्या की नाही, याबाबत उलटसुलट दावे-प्रतिदावे केले गेले व कागदपत्रे उभय बाजूंनी सादर केली. त्यावरून विलंबाला उभय बाजू जबाबदार आहेत, असे स्पष्ट होते. मात्र अक्कलकोट, बार्शी, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर व मोहोळ या पाच तालुक्यांच्या गट शिक्षण अधिकाऱ्यांनी आयोगापुढील सुनावणीपूर्वी तत्परतेने व विहित मुदतीत कृती केली नव्हती, त्यामुळे कु. कोणजी यांना अपुरी व विलंबाने माहिती मिळाली. संबंधित गट शिक्षण अधिकाऱ्यांनी चूक केली असून, त्याबाबत त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून दहा दिवसांत आपण आयोगाला अहवाल सादर करू, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी आयोगापुढील सुनावणीत मान्य केले.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. विहित मुदतीत माहिती न देणाऱ्या अक्कलकोट, बार्शी, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, व मोहोळ या पाच तालुक्यांच्या गट शिक्षण अधिकाऱ्यांवर केलेल्या प्रशासकीय कारवाईची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालात व सेवा पुस्तकात घ्यावी. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला दि. २०.१०.२००७ पर्यंत सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. १.१०.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. आबासाहेब शिवाजी सुतार
रा.मु.पो.करनुर, ता.कागल, जि.कोल्हापूर ४१६ २१६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
जिल्हा पोलिस अधीक्षक, कोल्हापूर, — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
पोलिस निरीक्षक, लक्ष्मीपुरी पोलिस स्टेशन, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. आबासाहेब शिवाजी सुतार
रा.मु.पो.करनुर, ता.कागल, जि.कोल्हापूर ४१६ २१६

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा पोलिस अधीक्षक, कोल्हापूर,
डॉ.सुखविंदर सिंह

**जन माहिती अधिकारी** तथा पोलिस निरीक्षक, लक्ष्मीपुरी पोलिस स्टेशन, कोल्हापूर
श्री.सुरेश सुधाकर देशपांडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१०.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

रविवार, दि. २८.८.२००५ रोजी सायंकाळी ४.४५ वाजलेचे नंतर लक्ष्मीपुरी पोलिस स्टेशनची जीप क्र. एमएच-०९-यू-७०६६ लक्ष्मीपुरीतील काही लॉजसमोर वेश्याव्यवसाय करणाऱ्यांवर कार्यवाहीसाठी थांबलेली, अपिलकर्त्याने स्वतः पाहिले होते. जीपमध्ये ड्रायव्हरखेरीज सफारी ड्रेसमध्ये (विनाखाकी ड्रेस) एकच पोलिस अधिकारी होते. तसेच एक वेश्या महिला होती. तिने दिलेल्या माहितीच्या आधारे त्या त्या लॉजवर वरील क्रमांकाची पोलिस जीप जात होती.

(१) संबंधित पोलिस कर्मचाऱ्याचे / अधिकाऱ्याचे नांव /हुद्दा / बक्कल क्रमांक.

(२) त्यांनी पकडलेल्या महिलेचे (वेश्येचे) नाव / पत्ता / वय / तिचा गुन्हा काय होता. तिचेवर कोणती कार्यवाही केली? वेश्याव्यवसाय किंवा लैंगिक संबंध झाला आहे अगर नाही बाबतची वैद्यकिय चाचणी केली होती काय? त्या चाचणीत काय उत्तर आले.

(३) कोणकोणत्या लॉजवर कार्यवाही करणेत आली, कोणत्या कलमाखाली / गुन्ह्याखाली कार्यवाही करणेत आली? लॉजच्या व्यवस्थापनावर गुन्हा नोंदविणेत आला काय? लॉजचा परवाना रद्द करणेची पुढील कार्यवाही करणेत आली काय?

## विवेचन

वेश्याव्यवसाय चालणाऱ्या एका लॉजसमोर रविवार, दि.२८.८.२००५ रोजी आपण स्वतः लक्ष्मीपुरी पोलिस ठाण्याची एमएच-०९-यू-७०६६ ही जीप पाहिली होती. त्यात ड्रायव्हरखेरीज साध्या वेषातील एकच पोलिस अधिकारी होते. त्यांनी पकडलेल्या महिलेचे (वेश्येचे) नाव, पत्ता, गुन्हा, तिच्यावरील कारवाई इत्यादी माहिती, त्या पोलिस अधिकाऱ्याचे नाव, हुद्दा यासह मिळावी, अशी माहिती अपीलकर्ता श्री.आबासाहेब शिवाजी सुतार यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलिस निरीक्षक, लक्ष्मीपुरी पोलिस स्टेशन, कोल्हापूर यांचेकडे मागितली होती. अशा प्रकारची कोणतीही कारवाई झाली नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. त्याविरुध्द श्री.सुतार यांनी अपिलीय

प्राधिकारी तथा पोलिस अधीक्षक, कोल्हापूर यांचेकडे अपील केले. प्रथम त्यांनी अपिलाची दखल घेतली नाही म्हणून श्री.सुतार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अशा प्रकारची घटना आपण स्वत: पाहिली आहे. पण जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अशी काही नोंद नसल्याचे म्हणत आहेत, म्हणजे खोटी माहिती देत आहेत, असे प्रतिपादन श्री.सुतार यांनी आयोगापुढील सुनावणीत केले व वस्तुस्थितीची चौकशी करावी व खोटी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. अशा प्रकारची कार्यवाही केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २०५ चे कक्षेत येत नाही.

अशा प्रकारच्या कोणत्याही घटनेची नोंद पोलिस दप्तरी नाही. त्यामुळे आपण दिलेली माहिती योग्य आहे, तसेच पोलिसांच्या नोंद पुस्तकातील त्या दिवसाच्या छायांकित प्रती श्री.सुतार यांना पाठविलेल्या आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा पोलिस निरीक्षक, लक्ष्मीपुरी पोलिस स्टेशन यांनी सांगितले. आपण एकदा समक्ष भेटून व दोनवेळा स्मरणपत्रे देऊनही अपिलाची दखल घेतली नाही, असे श्री.सुतार यांनी नमूद केले. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती योग्य असल्याचे त्यांना स्पष्ट केले होते, असे अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस अधीक्षक श्री.सुखविंदर सिंह यांनी सांगितले. मात्र विहित मुदतीत अपिलाची दखल घेतलेली नाही.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) विहित मुदतीत अपिलाची दखल घ्यावी अशी समज अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस अधीक्षक यांना देण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. ३१.१०.२००७**

aamcomp

15

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सदाशिव दत्तात्रय निकम
रा.टेक्निकल हौसिंग सोसायटी, फ्लॅट नं.१४,
ए वॉर्ड, वाशी रोड, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सदाशिव दत्तात्रय निकम,
रा.टेक्नीकल हौसिंग सोसायटी, फ्लॅट नं.१४,
ए वॉर्ड, वाशी रोड, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जि.कोल्हापूर
श्री.सुभाष शांताराम बोरकर

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, जि.कोल्हापूर
श्री.प्रशांत शांतराम आवटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.३.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

महाराष्ट्र फ्रीसेल केरोसीन विक्रेते व फेरविक्रेते आदेश २००५ नुसार फेरविक्रते अनुज्ञापन मिळणेबाबत सदाशिव द. निकम यांनी २९.१०.२००५ रोजी अर्ज केला आहे, याबाबत
(१)सदर प्रकरणी कोणती कार्यवाही झाली त्या आदेशाची साक्षांकित प्रत.
(अ)जर कार्यवाही झाली नसेल तर विलंबास कारणीभूत झालेल्या संबंधित कसूरदार अधिकाऱ्याचे नाव, पद आणि ते ज्या आदेशाने तेथे रुजू झाले त्या आदेशाची साक्षांकित प्रत.
(ब)उपरोक्त कसूरदार अधिकाऱ्यावर सदर प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांतर्फे कोणती कार्यवाही केली त्या आदेशाची साक्षांकित प्रत, तसेच आपल्या कार्यालयाने ठेवलेल्या टिप्पणीची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

## <u>विवेचन</u>

खुल्या केरोसीनचा फेरविक्रेता परवाना मिळण्यासाठी आपण केलेल्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.सदाशिव द.निकम यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. कार्यवाही झाली नसल्यास विलंबास कारणीभूत असलेल्या कसूरदार अधिकाऱ्याचे नाव, पद व त्याच्यावर केलेली कार्यवाही आदि तपशीलही त्यांनी मागितला होता. पूर्ण माहिती न मिळाल्यामुळे श्री.निकम यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. द्यावयाची राहिलेली माहिती पाच दिवसात देण्याचा आदेश देऊन त्यांनी अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री.निकम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.निकम यांनी खुल्या केरोसीनचा फेरविक्रेता परवाना मागितला आहे. ती त्यांची मुख्य मागणी आहे. त्यांनी केलेला माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज हा त्यांच्या मूळ मागणी पूर्ण करुन

घेण्यासाठीच्या प्रयत्नाचाच एक भाग आहे, हे उभय बाजूंच्या निवेदनातून आयोगापुढील सुनावणीत स्पष्ट झाले. त्यांच्या मूळ अर्जावर कृती केली, पण त्याची माहिती न देण्याची तांत्रिक चूक झाली असे जन माहिती आधिकारी तथा प्रभारी सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, श्री.प्रशांत शांतराम आवटे यांनी सांगितले. परवान्यासाठी केलेल्या मूळ अर्जातील काही बाबींची पूर्तता न झाल्यामुळे तो प्रलंबित आहे. संबंधित अधिकाऱ्याच्या जबाबदारीचा त्यामुळे प्रश्न येत नाही, म्हणून त्याची माहिती देणे शक्य नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले, अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याला दुजोरा दिला. मूळ अर्जातील त्रुटी दूर करुन पूर्तता केल्यास आजही श्री.निकम यांना परवाना देण्यास आम्ही तयार आहोत, असेही अपिलीय प्राधिकारी श्री.बोरकर यांनी स्पष्ट केले. त्याप्रमाणे पूर्तता करण्याचे निवेदन श्री.निकम यांनी केले व परवाना लवकरात लवकर मिळण्याची मागणी केली. हा सर्व विषय माहितीच्या अधिकारात येत नाही. एखाद्या मागणीची पूर्तता करुन घेण्यासाठी आपल्याला हव्या असलेल्या कार्यवाहीकरिता दबावाचे एक साधन म्हणून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा उपयोग केला जावा याबद्दल आयोग तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अपीलकर्त्यास तशी समज देण्यात येत आहे.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) केंद्रिय महितीचा अधिकार अधिनियम २००५ चे मूळ उद्दिष्ट व गाभा यास अनुसरुनच माहितीच्या अधिकाराचा अवलंब केला जावा, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. ३१.१०.२००७

३०६pune२३k-comp२